Publication: Pudhari
Date: 1/7/2019
Page: 2
Column: 2-4

पुढारी MY मुंबई सोमवार, १ जूलै २०१९

# आरेचा 'नवशाचा पाडा' अखेर अंधारातून प्रकाशात

## स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच वीज पोहोचली, पेढे वाटून जल्लोष

**जोगेश्वरी : विशाल नाईक**

गोरेगाव आरे कॉलनीतील नवशाच्या पाड्यात स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच वीज पोहोचली आणि रविवारी आदिवासी बांधवांनी पेढे वाटून आनंद साजरा केला.

आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी सुप्रिया चव्हाण, सुधाकर विदे, ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते या वीज जोडणीचे उद्घाटन करण्यात आले.

पहिल्या टप्प्यात ३७ घरांना वीजपुरवठा देण्यात आला आहे. उर्वरित ३० जणांना दुसऱ्या टप्प्यात लवकरात लवकर वीजजोडणी मिळणार आहे.

ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याने येथील रहिवाशांच्या घरात कालपर्यंत अंधारच होता. आदिवासी हक्क संवर्धन समिती, सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी, आदिवासी बांधवांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. २८ मे रोजी आदिवासी हक्क संवर्धन समितीकडून पशू महाविद्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आल्यानंतर पशू महाविद्यालय प्रशासनाने वीजजोडणी मिळण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिले. सामाजिक कार्यकर्ते व्यंकटेश चक्रवर्ती यांनी वीज जोडणीसाठी १ लाख ९० हजार रुपयांची मदत केली.



> एवढी वर्षे आम्ही अंधारातच होतो. मुलांना अभ्यास करणेही अवघड जायचे. घरात सापांचा वावर असल्याने रोजच दहशतीखाली जगणे नशिबी होते.
>
> **अनिता निमले,** आदिवासी महिला